शुक्रवार दि.३१ मे २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २७३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

## गेल कंपनी महाराष्ट्रातून का गेली?


# विरोधकांनी सरकारवर खापर न फोडता, सत्यता पडताळून पाहावी-उद्योग मंत्री सामंत

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

डोंबिवली येथे एम आय डी सी मध्ये स्फोट झाला त्यासाठी प्रधान सचिव उद्योग, प्रधान सचिव कामगार आणि प्रधान सचिव पर्यावरण यांची उच्च स्तरीय समिती नेमली आहे. ते तीन आठवड्यात अहवाल सादर करणार आहेत. ते अ, इ, उ लरींशसीळशी च्या इंडस्ट्रीचा आढावा घेणार आहेत. ज्या कंपनीने नियमांचे उल्लंघन केले आहे किंवा अनधिकृत बांधकाम केले असेल या सगळ्या बाबींचा सुद्धा आढावा घेतला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीला भेट दिली त्यावेळी त्यांनी काही निर्देश दिले आहेत त्याचे तंतोतंत पालन या समितीकडून आणि संबंधित अधिकारी यांच्याकडून केले जाणार आहे. अशी माहिती महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी आज मंत्रालयात या संबंधित आढावा बैठक घेतली होती.

मंत्री उदय सामंत म्हणाले की दोन वर्षापूर्वी एम आय डी सी आणि त्यातील केमिकल कंपन्यांचे स्थलांतरण करण्याचा निर्णय झाला होता. २०२२ मध्ये ठराव देखील झाला होता. मागील एक वर्षापासून पातळ गंगा, जांभवली येथे जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया देखील सुरू करण्यात आलेली आहे. परंतु आचारसंहितेमुळे ते थांबले होते आता आम्ही निवडणूक आयोगाला पत्र लिहून विनंती करणार आहोत की उद्योजकांना जागा वाटप करण्याची परवानगी द्यावी आणि त्यासाठी प्रक्रिया सुरू करावी, असा निर्णय आज बैठकीत झाला आहे. डोंबिवली स्फोटामध्ये सुमारे १३ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. वाणिज्य नुकसान १२ कोटी आणि रहिवासी नुकसान १ कोटी ६६ लाख आहे. हे सर्व नुकसान भरून काढण्यासाठी महाराष्ट्र सरकार सकारात्मक आहे. मृत व्यक्ती आणि गंभीर दुखापत होऊन डमिट आहेत त्यांचा ही खर्च सरकार करणार आहे. सगळ्यांना मदत करणार आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याबाबत आधीच सूचना दिल्या आहेत. ज्या कंपन्यांचे इन्शुरन्स आहे त्यांना सध्या तरी मदत करण्याची गरज वाटत नाही.भविष्यात महाराष्ट्रातील एम आय डी सी आणि केमिकल झोन मधील कंपनी यांचे स्थलांतरण करण्याचा प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठीचे



पावले सरकार उचलत आहेत. ज्या कंपन्यांनी नियमाचे पालन केले नाही. नियमांचे उल्लंघन केले आहे त्यांना त्या संदर्भातील नोटीस दिल्या गेल्या आहेत. या कंपन्या स्थलांतरण करताना त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी राज्य सरकार घेणार आहे.उदय सामंत पुढे म्हणाले की काही दिवसांपूर्वी विरोधी पक्षनेते यांनी आरोप केला की गेल कंपनी महाराष्ट्रातून निघून गेली त्याला सरकार जबाबदार आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की गेल कंपनी गेली त्याचे खापर आमच्यावर फोडू नये. गेल कंपनीने महाराष्ट्र सरकार कडे परिपूर्ण प्रस्ताव दिलाच नव्हता. त्यांनी रत्नागिरी मध्ये जागा मागितली होती त्यावेळेस एम आय डी सी कडे तिकडे जागा उपलब्ध नव्हती. जेव्हा उपलब्ध झाली तेव्हा त्यांनी आमच्या अधिकाऱ्यांना सरळ सांगितले की रिफायनरी साठी मागे दोन वेळा जे झाले, आंदोलने झाली, राजकीय दबाव टाकला. रिफायनरी पाहिजे की नाही हे नीट सांगितले नाही त्यामुळे त्यांनी पुढे प्रस्ताव दिलाच नाही.राज्य सरकारने स्थानिक पातळीवरील कंपन्या, जिल्हास्तरीय कंपन्या यासाठी शुर्पिीळेप आणि गुंतवणुकीसाठी योजना आखली होती. त्यामुळे छत्रपती संभाजी नगर ५६८ कोटी, नाशिक ९७५ कोटी, अमरावती २२९ कोटी, नागपूर १५९ कोटी, पुणे ३०५ कोटी, कोकण ४१६ कोटी म्हणजे एकूण २६५२ कोटींचे चजण झाले आणि गुंतवणूक छत्रपती संभाजी नगर १०३०७ कोटी, नाशिक २१७३३ कोटी, अमरावती ३७४६ कोटी, नागपूर १७८४८ कोटी, पुणे २१८०६ कोटी आणि कोकण २१५४९ कोटी म्हणजेच एकूण गुंतवणूक ९६६८१ कोटी एवढी झाली आणि त्यामुळे २३१३३० रोजगार निर्मिती झालेली आहे. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेमुळे २०१९-२०२० मध्ये १२२० उद्योजक तयार झाले. २०-२१ मध्ये ४८१२ उद्योजक, २१-२२ मध्ये ४०९३ उद्योजक, २२-२३ मध्ये १२३३६ उद्योजक आणि यावर्षी १९८०० उद्योजक म्हणजेच दोन वर्षात ३१००० उद्योजक तयार झाले आहेत. याचाच अर्थ मुखमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून ९०००० रोजगार निर्माण झाले आणि जिल्हास्तरीय २ लाख रोजगार निर्माण झालेले आहेत. त्यामुळे विरोधकांनी आकडेवारी व पेपर्स बघावे उगीच राजकारण करू नये. चरसपशींळल चरहरीरिहींर एक मोठा कार्यक्रम आपण ऑगस्ट किंवा सप्टेंबर मध्ये करतोय त्यातूनही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक येईल आणि त्यामुळे मोठी रोजगार निर्मिती होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.



## संपादकीय

# 'ससून'मधील कीड




**लोकनेता न्युज नेटवर्क**

केवळ पुण्यातीलच नव्हे, तर पश्चिम महाराष्ट्रातील सर्वांत मोठे सरकारी रुग्णालय अशी ख्याती असलेल्या ससून रुग्णालयातील गैरव्यवहारांची आणि गुन्हेगारीची सध्या बाहेर येत असलेली प्रकरणे वैद्यकीय गुन्हेगारीवरील कथा-कादंबऱ्यांतील आणि चित्रपटांतील कथानकांपेक्षाही धक्कादायक आहेत. अपुऱ्या पायाभूत सुविधा, औषधांचा तुटवडा, तज्ज्ञ डॉक्टरांची वानवा आदी अनेक कारणांमुळे आपल्याकडील खुद्द सार्वजनिक आरोग्य यंत्रणेची अवस्था गंभीर रुग्णासारखी झाली आहे. हा आजार बरा होण्याची चिन्हे नसतानाच भ्रष्टाचाराच्या आणि गुन्हेगारीच्या किडीने या यंत्रणेला पोखरल्याचे समोर येत आहे.ससून रुग्णालयातील ताजी प्रकरणे ही वरवरची लक्षणे म्हणता येईल. उपचारासाठी आलेल्या गरीब रुग्णांचे मूत्रपिंड काढून विकण्याच्या रॅकेटपासून अमली पदार्थांच्या तस्करीतील गुन्हेगारांची बडदास्त ठेवण्यापर्यंतची प्रकरणे समोर आल्यानंतर तेवढ्यापुरता 'ससून'ला लागलेल्या किडीची चर्चा झाली; परंतु ही कीड घालविण्यासाठीच्या शस्त्रक्रियेच्या दिशेने पावले पडलीच नाहीत. केवळ वरवरच्या उपाययोजना केल्या गेल्या. त्यामुळे कीड नष्ट होण्याऐवजी ती अधिक पसरत गेली. सध्या उघडकीस आलेले प्रकरण हे याचे ताजे उदाहरण म्हणता येईल. पुण्यात सध्या अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत आलिशान गाडी चालवून केलेल्या भीषण अपघाताचे प्रकरण गाजते आहे. बड्या धेंडाचा मुलगा असलेल्या 'गुणी बाळा'ने भरधाव गाडी चालवून केलेल्या अपघातात दोन निरपराध तरुणांचा जीव गेला. अशा बड्या लोकांच्या यंत्रणा कशी दिमतीला असते, याचे प्रत्यंतर लगेचच आले. अल्पवयीन मुलाची 'सोडवणूक' करण्याचे सर्व प्रयत्न केले गेले; परंतु सर्वसामान्य जागरूक नागरिकांनी हे प्रकरण उचलून धरल्यानंतर सरकारला त्याची दखल घ्यावीच लागली. त्यानंतर बाहेर येणारा प्रत्येक तपशील धनदांडग्यांचे लागेबांधे आणि त्यांच्या हुकूमावर नाचणारे काही सरकारी अधिकारी यांच्यातील हितसंबंधांवर प्रकाश टाकणारा आहे.

अल्पवयीन मुलाच्या रक्ताचा नमुना बदलण्याचा 'ससून'मधील प्रकार हा या हितसंबंधाचाच एक भाग. 'ससून'मधील न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अजय तावरे आणि आपत्कालीन विभागाचे प्रमुख मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर यांना हा उद्योग केला. 'जेव्हा डॉक्टर एखादी चूक करतो, तेव्हा तो संबंधित प्रकरणातील पहिला गुन्हेगार असतो,' या आर्थर कॉनन डायल यांच्या उक्तीनुसार हे दोघे पहिले गुन्हेगार ठरतात. शवविच्छेदन विभागातील शिपाई अतुल घटकांबळे याच्यामार्फत डॉ. हाळनोर यांना यासाठी तीन लाख रुपये दिले गेल्याचे पोलिस सांगतात. डॉ. हाळनोर यांनी अहवाल बदलून द्यावा, असे डॉ. तावरे यांनी सांगितले. विशेष म्हणजे, तसा अधिकारच डॉ. तावरे यांना नव्हता. तरीही त्यांनी हस्तक्षेप केला. याचा अर्थ त्यांनाही कोणीतरी सांगितलेले असावे. आपण सारे काही सांगू, असे त्यांनी सूचित केले आहेच. त्यामुळे या प्रकरणात आणखी काही बडी धेंडे असल्याचे दिसते. डॉ. तावरे हे 'ससून'चे अधीक्षक होते आणि त्यांची कारकीर्द वादग्रस्त ठरली होती. किडनी रॅकेटमध्येही त्यांचे नाव होते. त्यामुळे त्यांची अधीक्षकपदावरून हकालपट्टी झाली होती. त्यानंतरही त्यांना हे पद दिले जावे, यासाठी आमदार सुनील टिंगरे यांनी शिफारस केली होती. त्यामुळे ते पुन्हा त्या पदावर गेले. पुढे एका रुग्णाला उंदीर चावल्याचे प्रकरण घडले आणि परत त्यांना पायउतार व्हावे लागले. गेल्या वर्षी ललित पाटील प्रकरणही बरेच गाजले. अमली पदार्थ तस्करीशी संबंधित असलेल्या पाटीलसह नऊ कैद्यांची बडदास्त 'ससून'मध्ये ठेवण्यात आली. पुढे ललित पाटील पसार झाला आणि त्यामुळे तत्कालीन अधिष्ठात्यांना पायउतार व्हावे लागले.राजकीय हस्तक्षेपाद्वारे पदे मिळवून भ्रष्टाचार करण्याचा मार्ग प्रशस्त झाल्याचे 'ससून'मधील या घटनांवरून दिसते. गेल्या काही वर्षांपासून 'ससून'मधील राजकीय हस्तक्षेप वाढत आहे. हा हस्तक्षेप रुग्णांना उपचार मिळण्यासाठी नसून, शवविच्छेदनापासून कैद्यांच्या बडदास्तीपर्यंत अनेक कामांसाठीचा दिसतो. 'अर्थ'पूर्ण व्यवहाराद्वारे पदे द्यायची आणि त्यानंतरही अशाच व्यवहारांची साखळी निर्माण करायची, असा हा सारा प्रकार दिसतो. यामुळे भ्रष्टाचार कमालीचा वाढतो आहे, सगळ्या यंत्रणेचे गुन्हेगारीकरण होत आहे. यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तींच्या डॉक्टरांना बूस्टर डोस मिळत असून, या साऱ्यांत सर्वसामान्य, गरीब रुग्णांची मात्र परवड होत आहे. त्याची कोणालाही पर्वा नाही. ताज्या प्रकरणानंतर समितीद्वारे चौकशी होईल, संबंधित निलंबितही होतील. मात्र, हे वरवरचे उपाय आहेत. राजकीय हस्तक्षेप पूर्णपणे थांबविण्यापासून भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्यापर्यंतची पावले उचलल्याखेरीज ही कीड कायमची नष्ट होणार नाही. 'ससून'वर दररोज अवलंबून असलेल्या सुमारे पाच हजार रुग्णांसाठी ही शस्त्रक्रिया सरकार करणार काय, हा खरा प्रश्न आहे.

# दृष्टा स्त्री सम्राज्ञी लोकमाता अहिल्यादेवी होळकर!

**लोकनेता न्युज नेटवर्क**

नावाप्रमाणेच महाराष्ट्राचा इतिहासही महानच आहे! इथल्या इतिहासाला भूगोलाचीही तेवढीच अनमोल साथ आहे. अगदी प्राचीन काळापासून इथल्या प्रगल्भ, सर्वसमावेशक विचारांच्या अनेक साक्ष इमारती दऱ्या खोऱ्यात उभ्या आहेत. अनेक दुर्ग, किल्ले, लेण्या, मंदिरे, शिल्प, शिलालेख आणि ग्रंथ महाराष्ट्राच्या देदीप्यमान इतिहासाची साक्ष देत उभी आहेत. इथला राजेशाहीचा आणि संघर्षाचा इतिहासही तेवढाच उज्वल आणि थक्क करणारा आहे. अनेक राजे, महाराजे होऊन गेले ज्यांनी आपल्या भव्य-दिव्य कामाने आपली कीर्ती अजरामर करून ठेवली आहे. सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींची एकसंध मोठ बांधून रयतेचे राज्य उभे केले. गावातील शेवटच्या माणसाला सुरक्षा आणि आत्मविश्वास दिला. इथली स्त्री आणि तिची अब्रू सुरक्षित केली. हाच इतिहास शिवराय उत्तरकाळात अनेक राजांनी पुढे मोठ्या सन्मानाने चालवला. त्यात अठराव्या शतकात महाराष्ट्रातील एका शूर वीर धाडसी स्त्रीने आपले राज्य आणि राज्य कारभार मोठ्या हिमतीने चालवला अशा शूरवीर, लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची आज २९९ वी जयंती!



प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८

इतिहास आणि ऐतिहासिक महापुरुष आपल्याला नित्य दिशादर्शक असतात. त्यांची जयंती-मयंती साजरी करतांना आपण सावध होणे काळाची गरज आहे. लोकमाता अहिल्यादेवी होळकरांचा इतिहास आणि सर्वांगीण योगदान आपण लक्षात घेणे जरुरी आहे.ज्यांच्या मनगटात बळ,बुद्धी आणि चातुर्य आहे,तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा महान संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर ह्या केवळ एक राज्यकर्ती म्हणून आदर्श नसून एक स्त्री म्हणून मला जास्त प्रभावित करतात. सम्राज्ञी अहिल्यादेवी यांच्या साम्राज्यात सर्वधर्मसमभाव,अस्पृश्यता उच्चाटन,सामाजिक सलोखा,स्त्री पुरुष समानता,गोरगरिबांविषयी कळवळा,हुंडा पद्धतीचे समूळ उच्चाटन,अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा पुरता बिमोड,मूल दत्तक वारसाहक्क,सामान्य रयतेविषयी तळमळ असे महान समाजसुधारणावादी कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर! जन्मतांना आपण कुठे जन्मावे आपल्या हातात नाही, परंतु मरतांना कुठे आणि कसे मरावे हे मात्र नक्की आपल्या हातात असते. अहिल्यादेवींचे सासरे मोठे धोरणी विचारवंत होते. दूरदृष्टीच्या मल्हाररावांनी पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही अहिल्यादेवींना तत्कालीन दरबाराची मोडी-मराठी लिहिणे,वाचणे आणि गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. याशिवाय घोड्यावर बसणे,दांडपट्टा फिरवणे,युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे,लढाया करणे,दरबारात बसने, इतर शेजारी राज दरबारासोबत पत्रव्यवहार करणे, लोकांमध्ये जाऊन न्यायनिवाडा करणे इत्यादी कृतीशील प्रशिक्षण दिले. याचा परिणाम असा झाला की; अहिल्यादेवींची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली. आपल्या सासरचे हे सारेच संस्कार त्यांना मानाने आणि बुद्धीने सक्षम बनवत होते. दुर्दैवाने वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. दूरदृष्टी आणि विचाराने सक्षम झालेल्या अहिल्यादेवींनी सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे थांबवून जे मनोधैर्य दाखवले ते तत्कालीन परिस्थितीनुसार अद्वितीय आहे. सती गेल्यानंतर स्वर्ग-नरक इत्यादी विचारांना फाटा देवून, आपण जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा दृष्टा विचार करून अहिल्यादेवींनी प्रजा हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला. त्यांचा हा विचार मोठा क्रांतिकारी आणि धर्म,रूढी, परंपरा यापलीकडे माणूस म्हणून आपले कर्तव्य श्रेष्ठ आहे हे महत्त्वाचे माणून त्यांनी रयतेला कल्याणकारी राज्य दिले.त्यानंतर १२ वर्षांनी सासरे मल्हारराव होळकरांचे निधन झाले. एकामागून संकटे येत असतांना प्रजेच्या हितासाठी अत्यंत धीराने आपली रयत सुखी,समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी आपली अंतरीची दुःखे बाजूला



ठेवून राजेशाहीत सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता,स्वातंत्र्य,बंधुता,समता व न्याय इत्यादी महत्वपूर्ण मानव्य तत्त्वाप्रमाणे राज्य केले. असे असतांना तिकडे पेशवा रघुनाथराव याने होळकरांचे राज्य पेशवाईत विलीन करण्यासाठी ५० हजारांची फौज घेऊन इंदोरवर चढाई केली. यावेळी अहिल्यादेवींचे शौर्य, धैर्य आणि खंबीर नेतृत्व सर्वश्रुत झाले. पेशवा रघुनाथरावांना, मी आणि माझ्यासोबत माझी स्त्री फौज आपल्यासोबत निकराने युद्ध करेल. आम्ही हरलो तर लोक तुमचे शौर्य नाकारतील आणि हरलो तर तुमची अब्रू धुळीला मिळेल! असा खणखणीत खलिता पाठवला. हे वाचल्यावर रघुनाथराव वरमला आणि त्याने आक्रमणाचा विचार बदलला.राजमाता वीरश्री अहिल्यादेवी होळकरांचा त्यानंतरचा इतिहास मोठा विस्मयकारी आणि रणझुंजार आहे. मुत्सद्दी अहिल्या म्हणजे लखलख तळपती तलवार, चपळ विद्युल्लता होती. राज्यात अनेक लोककल्याणकारी योजना अखातांना सम्राट अशोकाचे राज्य आदर्श मानले. देशभर जागोजागी विहिरी,तलाव,कुंड,घाट बांधले आहेत. सगळीकडे रस्ते बांधले आणि पूल निर्माण केले. आजच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला लाजवेल असे निर्माणाचे काम अहिल्यादेवींनी आपल्या राजेशाही काळात करून देशासमोर एक स्त्री राज्यकर्ती म्हणून मोठा आदर्श निर्माण करून ठेवला. एवढेच काय, आपली राजधानी महेश्वर येथे हलवून आपल्या राज्यातील अठरापगड जाती, अलुतेदार-बलुतेदार, व्यापारी, कारागीर, मजूर, विणकर, कलावंत, साहित्यिक इत्यादी गुणवंतांचे कल्याणार्थ त्यांना निधी, जमीन, घर इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. मुंग्यांना साखर, पाण्यातील माशांना पीठाचे उंडे, उन्हाळ्यात वाटसरूंना थंड पाणी पिण्यासाठी पाणपोई, गरिबांसाठी अन्नछत्रे उभी केली. दिव्यांग, अनाथ, असहाय्य लोकांचे पुर्वसन केले. विशेषतः पक्षी, गुरे, ढोरे, वन्यप्राणी इत्यादींसाठी कुरणे निर्माण करतांना जंगलांचे संवर्धन केले. प्रवाशांसाठी मार्गावर अरण्यमय प्रदेशातही आंबराई,बगीचे,वृक्षारोपण विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या. घाट बांधतांना केवळ तज्ञांची मत विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात,कपडे धुताना बाळ कुठे ठेवायला सोयीस्कर पडेल,कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात?इतक्या बारीक तपशिलासह घाट बांधून घेतले.सामाजिक क्षेत्र योगदानाबरोब सर्वधर्मसमभावाचा आदर्श समोर ठेवत मंदिरे, मशिदी,दर्गे व विहार बांधले, अनेकमंदीरांचाजीर्णोद्धार केला. सर्वसमावेशक कार्यामुळे सर्व जाती धर्माचे लोक एकत्र आले. राज्यभर एकतेची विचारसरणी रुजली, एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरा सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाईनी कृतीने महाराणी आणि एक समाजसुधारक म्हणून लोकमान्य लोकमाता झाल्या. धर्माचे अवडंबर न माजवता केवळ मानवता हाच सर्वश्रेष्ठ धर्म मानून प्रजेवर विचाराने अधिराज्य गाजवले. लोकांवर अधिक करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला. आज मिडीयावर एकमेकांवर चिखलफेक करणाऱ्यांनी अशी चरित्रे वाचून आपले विचार समृद्ध करावे. असे झाल्यास खऱ्या अर्थाने शिवराय, अहिल्यादेवी आपले आदर्श असतील. तरुणांनी मिडियावरील मेसेज वाचून आपला दिमाख खराब करून घेण्याऐवजी या थोरांची चरित्रे वाचून विचारसमृद्ध, प्रगल्भ व्हावे. असे होणे म्हणजेच या थोर समाजसुधारक, दृष्टा, लोकमातेची आज जयंती साजरी करणे होय!


# महाराणी अहिल्यादेवी होळकर : जीवन आणि कार्य

**लोकनेता न्युज नेटवर्क**

राजमाता, लोकमाता, राष्ट्रमाता, समाजभूषण, कुलभूषण, कर्मयोगीनी, महातपस्विनी, रणरागिणी अशा अनेक बीरुदावलीचा संचय म्हणजे महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होत. महाराणी अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ में १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात चोंडी या खेडेगावी माणकोजी शिंदे पाटील यांच्या परिवारात झाला. त्या नऊ वर्षांच्या असतानाच मल्हाररावांचा एकुलता एक मुलगा खंडेराव यांच्याशी त्यांचा विवाह झाला. बालअहिल्येने राजशिक्षणाचे व प्रशिक्षणाचे धडे आपले सासरे मल्हारराव होळकरांकडून घेतले. बालपणातच मल्हाररावांनी घोड्यावर बसणे, दांडपट्टा चालवणे, राजकारणाचे व युद्धाचे डावपेच आखून लढाया करणे, स्वारी करणे, तह करणे, सूचक पत्रव्यवहार करणे, कर वसुली, न्यायदान आदींचे सूक्ष्म प्रशिक्षण बाल अहिल्येला दिले. लग्नानंतर काही वर्षांनी म्हणजे १७४५ ला अहिल्यादेवींना पुत्रप्राप्ती झाली, त्याचे नाव मालेराव, पुढे तीन वर्षांनी १७४८ ला मुक्ताबाई नावाची सुंदर कन्या जन्मास आली. अहिल्याबाईं राज्यकारभारात आपल्या पतीला मदत करीत असत, शिवाय त्यांच्यातील युद्ध आणि सैन्यकौशल्य उत्कृष्ट होण्यासाठी त्यांना सतत प्रोत्साहित देखील करीत असत. खंडेराव स्वतः उत्तम युद्धनिपुण होते. वडिलांच्या नेतृत्वात त्यांनी युद्धाचे कौशल्य प्राप्त केले होते. अहिल्याबाई होळकर यांच्या व्यक्तिमत्वातील गुणांमागे त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांचा सिंहाचा वाटा होता. सासरे मल्हाररावांनी आपल्या सूनबाईंना सैन्य, राज्यकारभार यांचं वेळोवेळी प्रशिक्षण दिलं. अहिल्याबाई मधील राज्यकारभाराचा गुण पाहून मल्हारराव आत्मिक समाधानी होते.

महाराणी अहिल्यादेवी होळकरांनी आपल्या आयुष्याला लोककल्याणकारी कार्यासाठी अर्पण करताना परिसर व प्रदेशाची मर्यादा न पाहता संपूर्ण भारतात कार्य केले. देशभर बारवं (विहिरी), तलाव, कुंड, घाट व पूल बांधले आजच्या शासनाला अजूनही चांगल्या पद्धतीने जमत नाही ते अहिल्याबाईंनी सहजपणे दूरदृष्टीने केले. आपल्या राज्यातील उद्योगधंद्याला त्यांच्या विकासाला प्राधान्य दिले. भिल्ल, रामोशी अशा आदिवासी जमातींचे पुनर्वसन करून मानवताधर्म जोपासणाऱ्या व वाढवणाऱ्या एकमेव महिला राज्यकर्त्या म्हणून त्यांचा उल्लेख गौरवाने करावाच लागतो.

राजमाता अहिल्यादेवींनी आपली सात्विकता, स्वामीनिष्ठा, धाडस, पराक्रम, हिंदू धर्मावरील प्रेम, अध्यात्मिक बळ, भूतदया आणि जोपासलेला भाईचारा इत्यादिकांच्या जोरावर संपूर्ण स्वराज्याला, प्रसिद्ध पेशवाईला आणि गौरवास्पद मराठेशाहीला संपूर्ण जगभरात प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. म्हणूनच अहिल्याबाई म्हणजे मराठेशाहीत उमलुन फुललेले एक दिव्य फुल आहे असे म्हटले जाते. आपल्या दिव्यत्वाच्या बळावरच



२९ वर्ष राज्यकारभार नेटाने चालवणाऱ्या एक महान महाराणी म्हणून अहिल्यादेवी होळकर लौकिक पावल्या आहेत. सर्व प्राणीमात्रांना संजीवनरुपी अमरप्रेम आणि जीवन देणाऱ्या अहिल्यादेवी होळकर मल्हाररावांचे स्वप्न पूर्णत्वास नेणाऱ्या एक महान पराक्रमी सुनबाई ठरल्या आहेत.

महाराणी अहिल्याबाई होळकर या केवळ एक महान शासकच नव्हे तर पराक्रमी योद्ध्या आणि सर्वश्रुत अश्या धनुर्धर होत्या. आपल्या २९ वर्षाच्या राज्यकारभारात अनेक युद्धांमध्ये साहसी योध्याप्रमाणे विचारपूर्वक निर्णय घेत त्यांनी युद्धाचे नेतृत्व करून विजय हस्तगत केला होता. आपल्या प्रांताच्या रक्षणार्थ व अन्याया विरुद्ध आक्रमण करण्यास कधीही हयगय करत नसत. म्हणूनच महाराणी अहिल्याबाईंची ओळख मावळ प्रांताच्या राजमाता म्हणून होती, त्यांच्यातील अद्भुत साहसाला आणि अदम्य प्रतिभेला पाहून मोठ-मोठे राजे आणि प्रभावशाली शासक देखील आश्चर्यचकित होत असत. अहिल्याबाई सतत महिला सशक्तीकरणाच्या बाजूने होत्या. स्त्रियांची परिस्थिती बदलण्या करता त्यांनी बरेच प्रयत्न केलेत. विधवा स्त्रियांना त्यांचा हक्क मिळण्याकरता अहिल्याबाईंनी कायद्यात बदल करून विधवा महिलांना त्यांच्या पतीच्या संपत्तीत अधिकार मिळवून दिले व मुल दत्तक घेण्याचा हक्क देखील प्राप्त करून दिले.



डॉ.गोविंद पाटील,
वझरगा ता.देगलूर
जि.नांदेड

अहिल्याबाईंचे हृदय दया, क्षमा, निष्ठा, परोपकार या भावनांनी ओतप्रोत भरलेले होते, म्हणूनच करुणेची देवी, कुशल समाजसेविका या प्रतिमेने त्यांना ओळखलं जातं.आपल्या स्वतःच्या आयुष्यात दुःखाचा डोंगर कोसळल्या नंतरही अहिल्यादेवींनी धीर खचू न देता राजकारभार सांभाळला. वैयक्तिक दुःखाचा प्रभाव त्यांनी प्रजेवर पडू दिला नाही. पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे ढासळणाऱ्या आपल्या मावळ प्रांताला पाहून त्यांनी स्वतः उत्तराधिकारी होण्याचा निर्णय घेतला. व ११ डिसेंबर १७६७ रोजी मावळ प्रांताची सूत्र आपल्या हाती घेतली. आपल्या अद्भुत शक्ती आणि पराक्रमाच्या बळावर प्रजेचा विश्वास संपादन करत इतिहासातील सर्वात पराक्रमी आणि कुशल योद्धा म्हणून महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी लौकिक प्राप्त केलं. आपल्या कार्यकाळात अहिल्याबाईंनी अनेकदा युद्धात प्रभावशाली रणनीती आखत सैन्याचे कुशल नेतृत्व करून विजयही संपादन केले.लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचा राज्यकारभार हा समर्पित वृत्ती, अन्यायाची चीड, दुर्बलांचे रक्षण, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता व दुष्टांना शासन अशा तत्वावर आधारित होते. अहिल्यादेवींच्या ताब्यात माहेश्वर, चांदवड, आर्शीगढ, सेंधवा, गणबा, कुशालगड, हिंग्लजगड असे सात किल्ले होते. या सर्व किल्ल्यांवर संरक्षण व्यवस्था अतिशय चोख ठेवली होती. त्या जिवंत असेपर्यंत इंग्रजांना कुठेच शिरकाव करू दिला नाही. एवढी जरब त्यांच्या राज्यकारभारात होती, अशी आदर्श राज्यकर्ती धनगर महिला म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत. भारताच्या इतिहासातील स्वकर्तृत्वाने प्रज्वलित झालेले थोर व्यक्तिमत्व म्हणजे अहिल्यादेवी होळकर होय. मराठ्यांच्या इतिहासात होळकर संस्थांनचे महत्त्वाचे योगदान आहे. होळकर संस्थानातील मल्हाराव होळकर, तुकोजीराव होळकर, पहिले तुकोजीराव होळकर इत्यादी शूरवीर पराक्रमी धनगरांचा देदीप्यमान इतिहास आहे. मल्हारराव, यशवंतराव मुस्तदी पराक्रमी सरदार होते. त्यांनी मराठा साम्राज्यात अनेक लढायात यश संपादन केले. त्यामुळेच पेशवाईमध्ये होळकरांचे स्वतंत्र राज्य स्थापन झाले आणि मल्हाररावांचे शौर्ययुक्त साहस चिरंतन ठरले. हाच वारसा जपत मल्हाररावांच्या राज्याचा कारभार नंतरच्या काळात अहिल्यादेवी होळकरांनी २९ वर्ष अतिशय नेटाने चालविला आहे व राज्यव्यवस्थेचा समाजव्यवस्थेचा आणि धर्मव्यवस्थेचा आदर्श पायाच घालून देण्याचे काम महाराणी अहिल्यादेवी होळकर यांनी केलं आहे. तत्कालीन समाजात आदर्श समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, न्यायव्यवस्था व धर्मनिरपेक्षता आणि लोककल्याणकारी राज्य इत्यादी आदर्श मूल्यांची रुजवणच महाराणी अहिल्यादेवी होळकर यांनी केलेली आहे, हे आपणास विसरून चालणार नाही. तरी पण आजच्या २१ व्या शतकातही महिलांना राजकारणात समान वाटा नाही व धनगर समाजाचा इतका प्रचंड देदीप्यमान इतिहास आणि समृद्ध राजकीय वारसा असताना देखील राज्यकर्त्या धनगर समाजाची आज राजकीय अवस्था अत्यंत दुर्दैवी असल्याचे निदर्शनास येते आहे. धनगर समाज हा राजकारणापासून हजारो मैल दूर आहे, तो दूर फेकला गेला आहे. राजकारणाशी आपला काहीएक संबंध नाही, राजकारण हे आपले काम नाही अशी मानसिकता समाजाची बनलेली आहे. समाज आपला समृद्ध इतिहास विसरलेला आहे. तो स्वतःचे आत्मभान आणि आत्मसन्मान हरवून बसला आहे. त्यामुळे आपण राज्य करावे ही मानसिकताच मुळात या समाजात फारशी दिसत नाही. तो आता फक्त मतदानाचाच धनी राहिला आहे. त्यामुळे आधुनिक स्वातंत्र्योत्तर लोकशाहीत धनगर समाजाचे 'राजकीय स्थान' हे कालबाह्य झाले आहे की काय? हा यक्षप्रश्न एक अभ्यासक म्हणून माझ्यासमोर निर्माण होतो आहे. कारण संसदेमध्ये व विधिमंडळात धनगर समाजाचे नेतृत्व किती प्रमाणात आहे ? हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे. म्हणून मला असे वाटते की, आदर्श राज्यकर्त्या अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास अभ्यासण्याची व आपल्यातील आत्मभान आणि आत्मसन्मान उभं करण्याची गरज समाजाला आहे. एवढेच आजच्या जयंतीच्या निमित्ताने केलेल्या या लेखप्रपंचातून सांगावेसे वाटते. महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन व जन्मोत्सवाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा....!!!

# कृ.उ.बा.स कार्यालयं मलकापूर येथे १४४ कलम लागू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

कृषी उत्पन्न बाजार समिती मलकापूरचे सभापती शिवचंद्र तायडे यांचेविरूध्द अविश्वास ठराव पारीत करण्याबाबत सदस्यांनी केलेल्या मागणी अनुषंगाने ३१ मे रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपबाजार मलकापूर कार्यालयाचे सभागृहामध्ये सकाळी ११ वाजता विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. सभा कालावधीत कायदा व सुव्यवस्था परिस्थिती कायम राहण्याच्या दृष्टीने तसेच सभा निर्भय व नि:पक्षपातीपणे पार पडावी याकरीता प्रभारी उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार राहुल तायडे यांनी कृउबास उपबाजार हद्दीपावेतो परिसरात जमाव करण्यास, वाहनांचा प्रवेश, अनधिकृत प्रवेश यावर तसेच ज्याद्वारे नियमांचा भंग होईल असे कोणतेही कृत्य करण्यास बंदी घालण्याचे आदेश आज २९ मे रोजी जारी केले आहे.

जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडील आदेश क्र.कावि/स्थानि/कक्ष-९-३/१५१/२०२४, दि.२१.५.२०२४ नुसार महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व नियमन) अधिनियम, १९६३ चे कलम २३ (अ) (२) मधील तरतुदीनुसार कृषी उत्पन्न बाजार समिती, मलकापूरचे सभापती यांचे विरूध्द अविश्वास ठराव पारीत करणेबाबत केलेल्या मागणी पत्र दि.२१/५/




२०२४ नुसार कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्यांची विशेष सर्वसाधारण सभा कृउबास मलकापूर येथील कार्यालयाचे सभागृहामध्ये ३१ मे रोजी सकाळी ११ वा. आयोजित करण्यात आलेली आहे. फौजदारी प्रक्रिया १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मलकापूर उपविभागातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपबाजार मलकापूर परिसराच्या हद्दीपावेतो विशेष सर्वसाधारण सभा कालावधीत कायदा व सुव्यवस्था परिस्थिती कायम राहण्याच्या दृष्टीने तसेच विशेष सर्वसाधारण सभा निर्भय व नि:पक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ आचारसंहिता लागू असल्यामुळे विशेष सर्वसाधारण सभा कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यादृष्टीने केवळ कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपबाजार हद्दीपावेतो परिसरात जमाव करण्यास, वाहनाचा प्रवेश,अनधिकृत प्रवेश यावर तसेच ज्याद्वारे नियमाचा भंग होईल असे कोणतेही कृत्य करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# पिंपळगाव लेंडी फाट्यावर अज्ञात महिलेचा खून

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

तालुक्यातील पोलीस स्टेशन किनगाव राजा यांच्या हद्दीतील पिंपळगाव लेंडी फाट्या नजिक व्दारकाबाई सुभाष गायके यांच्या शेतात जुन्या पडक्या खोलीच्या मागे रात्री १००. ते सकाळी ०६ वाजेच्या सुमारास एका अनोळखी महिलेचा अर्धवट जळलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला होता. पोलीसांनी या संदर्भात बुलढाणा येथे अपराध क्र. १२२/२०२४ कलम ३०२,२०१ भादवि चा दि.३०.०५.२०२४ रोजी दाखल केला असून सदर महीला ही अंदाजे २५ वर्षे. वयाची असावी, तसेच महीलेल्या डाव्या पायाची बोटे कापलेली असुन डाव्या पायाला सहा बोटे असावीत, महीलेने जॉकी कंपनीची काळ्या रंगाची निकर परीधान केलेली असुन, अज्ञात व्यक्तींनी अज्ञात ठिकाणी सर्वप्रथम तिचा खुन करून पिंपळगाव लेंडी शिवारात डेड बॉडी आणुन पुरावा नष्ट करण्यासाठी जाळलेली असावी असा पोलिसांचा अंदाज आहे.सदर प्रेतवर उत्तरीय शवविच्छेदन कारवाई साठी जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे पाठविले आहे. सदर घटनास्थळी पोलीस अधिक्षक सुनील कडासने,



अप्पर पोलीस अधीक्षक महामुनी, मनिषा कदम देउळगाव राजा उपविभागीय पोलीस अधिकारी, लांडे एलसीबी बुलढाणा पीआय, विकास पाटील ठाणेदार पोस्टे अंढेरा यांनी भेट दिली असुन, सदर मृतक अनोळखी महिला हिचा आपलेऋपोस्टेहद्दीत शोध होऊन तिचे नातेवाईका बाबत माहिती मिळून आल्यास पोस्टे किनगाव राजा ता. सिंदखेद राजा जि. बुलढाणा येथील सपोनि. विनोद नरवाडे ठाणेदार किनगाव राजा संपर्क ९६७३०४१००१, पोउपनी युवराज राठोड संपर्क ७७७४८६२९५२, पोकॉ सुभाष गीते संपर्क क्र. ८७६६४९५६३१ यांच्याशी संपर्क करावा. गुन्हाचा पुढील तपास विनोद नरवाडे ठाणेदार पोलीस स्टेशन किनगाव राजा हे करीत आहेत.

# शेतकऱ्यांनी कापूस बियाण्यांच्या ठराविक वाणांचा आग्रह धरु नये-विकास पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । भगवान जाधव**

महाराष्ट्र राज्यात कापूस बियाणे पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. परंतु शेतकऱ्यांनी कापसाच्या विशिष्ट वाणांसाठी आग्रह धरु नये असेआवाहन कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) विकास पाटील यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्यात कापूस पिकांचे सर्वसाधारण क्षेत्र ४०.२० लाख हेक्टर आहे. कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार प्रती हेक्टर ४.२ पाकिटे बियाण्याची आवश्यकता असते. या क्षेत्राकरिता १ कोटी ७० लाख पाकीटाची आवश्यकता आहे. सर्व कंपन्यांचा आढावा घेतला असता साधारणपणे १.७५ कोटी पाकीटे उपलब्ध आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात कापूस बियाण्याची कमतरता नाही. महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्यांमध्ये कापसाच्या काही वाणांना विशेष मागणी आहे. परंतु त्याच बरोबर इतर कंपन्यांचे कापसाचे वाण सुध्दा अतिशय चांगले उत्पादन देत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी कापूस पिकाच्या ठराविक वाणांचीच मागणी करु नये, असे कृषि विभागामार्फत आवाहन करण्यात येत आहे. केंद्र सरकारने खरीप २०२४ साठी कापूस बीजी-खख चा दर ८६४ रुपये निश्चित केला आहे. कापूस बियाणे जादा दराने विक्री करणाऱ्या कृषि सेवा केंद्र तसेच कापूस उत्पादक कंपनी यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच काही ठिकाणी कापूस जादा दराने विक्री केली असल्याचे निदर्शनास आल्यानंतर कृषि विभागातील स्थानिक कृषि सहाय्यक यांच्या मदतीने संबंधित कापूस बियाण्याचे वाटप कृषि विभागाच्या कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्याचे नियोजन संबंधित जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी केलेले आहे. कापूस बियाणे पाकीटांची जादा दराने विक्री केल्यामुळे जळगाव, धुळे व छत्रपती संभाजीनगर येथे विक्रेत्यांवर कृषि विभागामार्फत गुन्हे दाखल केले आहेत. राज्यात एकूण एच.टी. बीटी कापूस बियाण्याबाबत चंद्रपूर जिल्ह्यामध्ये चार ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये ४५६८.३० किलो बियाणे साठा जप्त करण्यात आले असून त्याचे मूल्य ६६.८५ लाख रुपये इतके आहे. गडचिरोली जिल्ह्यात ५५.३२ किंमतीचे ३० क्विंटल बियाणे जप्त करण्यात आले. तसेच नंदूरबार व धुळे जिल्ह्यात तीन ठिकाणच्या कारवाईत १८०७ एच.टी. बीटी कापूस बियाणे पाकीटे ३७.९६ लाख रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. अमरावती विभागातील यवतमाळ जिल्ह्यात तीन ठिकाणी ११३ बियाणे पाकीटे जप्त करण्यात आली असून त्याचे मूल्य १.५५ लाख रुपये इतके आहे. सर्व जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर भरारी पथकांमार्फत मोहिम स्वरुपात तपासण्या करण्यात आल्या असून त्यानुषंगाने दोषींवर कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती कृषि संचालक (निवगुनि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी दिली आहे.

# पुरुषोत्तम धोंडगे यांनी वाढदिवसानिमित्त पिडीत कुटुंबियांना केली,आर्थिक मदत

## प्रत्येकी ५० हजाराची आर्थिक मदत करुन समाजासमोर आदर्श ठेवला आहे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून कंधार व लोहा तालुक्यातील आकस्मिक घडलेल्या घटनांतून संकट ओढवलेल्या तीन व्यक्तींच्या कुटुंबातील लोकांना भेटून त्यांना धीर देत प्रत्येकी ५० हजाराची आर्थिक मदत करुन समाजासमोर आदर्श ठेवला आहे.



कंधार शहरातील अतिशय हलाखीच्या परिस्थितीत आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे खाजगी चालक शेख अय्युब शेख रसूल यांचे काही दिवसांपूर्वी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले होते. धानोरा (शे) येथील कृष्णा जानकीराम भुजबळ या बारावीच्या विद्यार्थ्यांने निट परिक्षेत कमी गुण आल्याने आत्महत्या केली होती. तसेच लोहा तालुक्यातील बेरळी येथील इयत्ता दहावी वर्गात शिकत असलेल्या सुमित शरद ढेंबरे या विद्यार्थ्याने मराठा आरक्षण न मिळाल्यामुळे आत्महत्या केली होती.

या तिनही कुटुंबांना प्रा. डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली. पिडीत कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असतांना त्यांना मदतीचा हात देणे हे सामाजिक कार्य आहे. त्या कुटुंबीयाला फुल नाही फुलाची पाकळी म्हणून प्रत्येकी ५० हजार रुपये मदत म्हणून देणे हे माझे कर्तव्य आहे. असे पुरुषोत्तम धोंडगे यांनी सांगितले. यावेळी माजी उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी,जफरउल्ला खान,उत्तम चव्हाण, परमेश्वर जाधव, माधवराव भालेराव, माधवराव पेठकर,माधव कांबळे, गुरुनाथ पेठकर, उत्तम भांगे आदिंसह उपस्थित होते.

# दोन वर्षाचे १५ व्या.वित्त आयोगातील जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील २० % कपात केलेले अनुदान ग्रामपंचायतकडे वर्ग करावे

## सरपंच परिषदेची मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्र्याकडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र या संघटनेचे जळगाव जिल्हा उपाध्यक्ष तथा रावेर तालुक्यातील अटवाडे ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश ज्ञानेश्वर महाजन यांनी संघटनेकडे पत्र दि.२४ मे २०२४ या संदर्भीय पत्राव्दारे मागणी केल्यावरुन मार्च २०२२ पासून जिल्हा परिषद व पंचायत समितीवरील पदाधिकारी यांचा कार्यकाल संपला आहे.सर्व ठिकाणी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत.केंद्र शासनाकडून १५ व्या.वित्त आयोग निधीमधून ग्रामपंचायतींना ग्रामीण भागातील आरोग्य, शिक्षण यासारख्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी निधी दिला जातो. त्यातील महाराष्ट्र राज्यामध्ये या १५ व्या. वित्तआयोग निधीमधील जिल्हा परिषद १० टक्के आणि पंचायत



समितीस्तरावर १० टक्के असा एकूण २० टक्के निधी राज्यस्तरावर कपात करण्यात आलेला आहे परंतु अद्यापही हा निधी विकास कामांसाठी वर्ग करण्यात आलेल्या नाही त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत अशा प्रकारची भावना सर्व ग्रा.पं.सरपंच यांच्याकडून व्यक्त होत आहे.त्यानुसार राज्यस्तरावर आणि केंद्र शासनस्तरावर या महत्त्वपूर्ण विषयावर पाठपुरावा करून हा निधी राज्यातील ग्रामपंचायतींना मिळेल यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.सन २०२२ ते २०२४ या दोन वर्षाचे १५ व्या वित्त आयोगातील जिल्हा परिषद १० टक्के आणि पंचायत समिती स्तरावरील १० टक्के असे एकूण २० टक्के कपात केलेले अनुदान ग्रामपंचायत स्तरावर वर्ग करावे अशी सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी लेखी पत्रानुसार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, ग्रामविकास मंत्री ना.गिरीश महाजन,केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री ना. गिरिराज सिंह, ग्रामीण विकास विभाग नई दिल्लीचे सचिव शैलेसकुमार सिंह यांच्याकडे मागणी केली आहे.

## नागपूर विभाग समीतीच्या प्रमुखपदी विजय वडेट्टीवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर (वृत्तसंस्था)**

राज्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्याची व जनावरांच्या चाऱ्यांची मोठी समस्या असून रोजगारही मिळत नाही. राज्यातील महाभ्रष्टयुती सरकारला दुष्काळाची चिंता नाही. जनता दुष्काळाने होरपळ असताना महायुती राजकीय साठमारीत व्यस्त आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त भागाला भेट देऊन तेथील परिस्थितीची माहिती घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने विभागनिहाय दुष्काळ पाहणी समित्यांची स्थापन केली असून या समित्या दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून विभागीय आयुक्तांना व प्रदेश काँग्रेसला अहवाल सादर करणार आहेत.नागपूर विभागीय समिती प्रमुख म्हणून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची नियुक्ती केली आहे.

## चारोळी

**मैत्री सारखं निखळ नातं**
**कुठेच शोधून सापडत नाही**
**अंतरंग ओसंडून वाहते अन**
**आठवांच्या हिंदोळ्यावर झुलत राही.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# बोअरवेल स्टार्टर दुरुस्त करण्याची मागणी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

तालुक्यातील मौजे कुंडलवाडी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर येथे बोअरवेल खराब झाले असून त्याठिकाणी पाणी पुरवठा होत नाही उन्हाळ्याचे दिवसा असल्यामुळे पाण्याची जास्त आवश्यकता असते त्यामुळे खराब झालेले बोरवेल व स्टार्टर व त्या ठिकाणी वायरिंग नादुरुस्त झाले असून नवीन वायरिंग टाकून बोरवेल तात्काळ चालू करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत कांबळे, सुवास देवकरे यांनी नगरपरिषद कुंडलवाडी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

# पाटोदा येथे कुस्ती मॅट हॉलचा शुभारंभ व पैलवान आवारे यांच्या वाढदिवसा निमित्त कुस्तीचे भव्य मैदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथे कुस्ती मॅट हॉलचा भव्य शुभारंभ अर्जुन वीर पुरस्कार विजेते डी.वाय.एस.पी.पैलवान राहुल आवारे, जय हनुमान तालीम संचलित भव्य मॅट हॉलचा शुभारंभ दिनांक ०१ जून-२०२४ शनिवार रोजी दुपारी ०३:०० वाजता आयोजित करण्यात आले आहे. तर पैलवान बाळासाहेब आवारे यांच्या वाढदिवसा निमित्त भव्य कुस्तीचे मैदान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे ठिकाण जय हनुमान तालीम चुंबळी फाटा ता.पाटोदा,जि.बीड येथे होणार आहे.या कार्यक्रमासाठी ह.भ.प.रामकृष्ण रंधवे बापू, ह.भ.प.सतीश महाराज उरणकर, ह.भ.प.राधाताई महाराज सानप, हनुमान महाराज येवले यांच्या शुभहस्ते मॅट हॉलचा शुभारंभ होणार आहे. व या कुस्ती मैदानाचे उद्घाटन विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस, आमदार राम शिंदे, आमदार . बाळासाहेब आजबे काका, माजी आमदार भीमराव धोंडे, मा.पंढरीनाथ आण्णा पठारे, मा.काकासाहेब पवार अर्जुन पुरस्कार विजेते यांच्या हस्ते कुस्ती मैदानाचे उद्घाटन होणार आहे. या वेळी कुस्ती ही फिरून एक ही कुस्ती लावली जाणार नाही. सर्व कुस्त्या ह्या ठरलेल्या पैलवाना सोबतच लागतील मैदान वेळेवर ०३:०० वाजता सुरू होईल असे निमंत्रक पैलवान गोकुळ आवारे मल सम्राट महाराष्ट्र केसरी यांनी सांगितले आहे. व १ लाख ५१ हजार रुपये कुस्ती पैलवान हर्षद सदगीर(महाराष्ट्र केसरी), काकासाहेब पवार यांचा पठ्ठा पुणे व पैलवान बाला रफी शेख (महाराष्ट्र केसरी) पैलवान गणेश दांगट यांचा पठ्ठा पुणे यांच्या मध्ये होईल. या वेळी पंचक्रोशीतील सर्व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी सर्वांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन पैलवान राहुल आवारे (डी.वाय.एस.पी.) यांनी केले आहे.

**प्रथम कुस्ती १ लाख ५१ हजार रुपये...**

# बोळेगाव येथील कु.सृष्टी कांबळे हिचे दहावी परीक्षेत यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील बोळेगाव येथिल रहिवासी असलेले भिमराव शंकर कांबळे यांची मुलगी कु सृष्टी भिमराव कांबळे हिने दहावी बोर्ड परीक्षेत ९८.९८टक्के गुण मिळवून शाळेत पहिला क्रमांक मिळविली आहे बोळेगाव येथिल भिमराव शंकर कांबळे यांची मुलगी कु सृष्टी भिमराव कांबळे हि बिलोली येथील लिट्ल फ्लॉवर कॉन्व्हेंट इंग्लिश स्कूल बिलोली या शाळेतुन मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्डची परीक्षा दिली होती या मिळवलेल्या यशाबद्दल बोळेगाव नगरीचे सरपंच प्रतिनिधी विश्वनाथ बोधनापोड माजी सरपंच धोंडीबा शिरगिरे सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन अशोक पाटील मारुती भालेराव पत्रकार प्रल्हाद वाघमारे लालबा गोणेकर सतिश वाघमारे ज्ञानेश्वर वाघमारे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ रजनी राणी मॅडम यांचे मार्गदर्शन दिलिप वाघमारे सहशिक्षक सह अनेकांनी अभिनंदन केले.



# सतत चमकोगिरी करणाऱ्या जितेंद्र आव्हाड यांच्यावर दुष्कृत्या बद्दल कठोर कार्यवाही करावी

## अद्यापही माफी न मागणाऱ्या पक्षश्रेष्ठींचे या कृत्यास समर्थन आहे काय?–आ.सुरेश धस यांचा संतप्त सवाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के



महाड येथे मनुस्मृति जाळण्याच्या नावाखाली मीडियासमोर चमकोगिरी करण्याच्या नादात आ. जितेंद्र आव्हाड याने महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा फाडण्याचे दुष्कृत्य केले आहे याला माफी नाही त्यामुळे हा गंभीर गुन्हा करणाऱ्या जितेंद्र आव्हाड याचेवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि जितेंद्र आव्हाड ज्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात आहेत.त्या पक्षश्रेष्ठींनी अद्यापही जितेंद्र आव्हाड यांच्या या दुष्कृत्याबद्दल समस्त जनतेची माफी मागितलेली नाही त्यामुळे जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या या अत्यंत वाईट कृत्यास पक्षश्रेष्ठींचे समर्थन आहे काय ?असा संतप्त सवाल आ.सुरेश धस यांनी केला आहे.

आष्टी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे झालेल्या आ.जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले त्यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, आ.जितेंद्र आव्हाड हे सतत शाहू, फुले, आंबेडकर यांची नावे घेत असतात परंतु काल महाड येथे महामानव, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा फाडताना जितेंद्र आव्हाड यांच्या जे पोटात आहे तेच ओठावर आले आणि केवळ ओठावर आले असे नाही तर त्यांनी अत्यंत महापाप असलेले कृत्य केले आहे त्यामुळे त्यांना केवळ माफी मागून चालणार नाही. त्यांना या कृत्याबद्दल माफी नाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती जाळली परंतु मनुस्मृतीच्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो नसतो मात्र जितेंद्र आव्हाड यांनी चमकोगिरी करण्याच्या नादात कागदावर मनुस्मृती आणि त्याच्याखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो ठेवून हे महापाप केले आहे केवळ मीडियासमोर चमकोगिरी करण्याच्या नादात आपण कोणते दुष्कृत्य करत आहोत ?याचा बेभान झालेल्या आव्हाड यांना विसर पडला आणि त्यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा फाडून गंभीर गुन्हा केलेला आहे त्याबद्दल त्यांचे वर कठोरात कठोर कार्यवाही करावी अशी आपली मागणी असल्याचे सांगितले तसेच या दुष्कृत्याबद्दल जितेंद्र आव्हाड ज्या राजकीय पक्षात आहेत त्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाच्या कोणत्याही ज्येष्ठ नेत्याने जितेंद्र आव्हाड यांच्या या कृत्याचा निषेध केलेला नाही किंवा या नीच कृत्याबद्दल माफी देखील मागितलेली नाही त्यामुळे जितेंद्र आव्हाड यांच्या या कृत्यास त्यांच्या पक्षश्रेष्ठींचे समर्थन आहे काय ? असा प्रश्न निर्माण होत असल्याचे ते म्हणाले.यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अँड.साहेबराव म्हस्के, अँड.वाल्मीक निकाळजे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे,रिपाई नेते अरुण भैय्या निकाळजे,आदिनाथ सानप,खंडू दादा जाधव,सचिन लोखंडे,दिपक निकाळजे,राजू निकाळजे, नगराध्यक्ष जिया बेग,युवा नेते गणेश शिंदे,अशोक पवार,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,सरपंच अशोक मुळे,माजी सरपंच अतुल कोठुळे,नगरसेवक शरीफ शेख, अक्षय धोंडे,आशिष अग्रवाल,पप्पु गर्जे,बबन लोंढे, संतोष रणशिंग, प्रविण कदम,शिवाजी आवारे,नवनाथ चखाले,मनोज धनवडे,विलास गोयकर,अमृत पोकळे, तय्याब पठाण,पप्पू निकाळजे,श्याम वाल्हेकर,ज्ञानदेव वाल्हेकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महाड येथे आमदार जितेंद्र आव्हाड आणि शेकडो कार्यकर्त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा फाडून घटनाकारांचा राष्ट्रपुरुषाचा अवमान केलेला आहे त्यामुळे आष्टी पोलीस स्टेशन येथे जितेंद्र आव्हाड यांच्याविरुद्ध राष्ट्र द्रोह धार्मिक भावना दुखावणे आणि अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यासाठी फिर्याद दिलेली आहे शरदचंद्र पवार यांनी जितेंद्र आव्हाड यांच्या या दुष्कृत्याबद्दल जनतेची जाहीर माफी मागावी

–अँड.वाल्मीक निकाळजे
प्रदेश उपाध्यक्ष,भा.ज.पा.अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र राज्य

आ.जितेंद्र आव्हाड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा फाडून नीच कृत्य केले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरम तर्फे आम्ही आष्टी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यासाठी फिर्याद दिलेली आहे

– यशवंत खंडागळे
जिल्हाध्यक्ष,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरम बीड

# अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त ह.भ.प विकास महाराज देवडे यांचे किर्तन

## खानवटे येथे दरवर्षी जयंती होते सांप्रदायिक पद्धतीने साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे



खानवटे तालुका दौंड येथे दिनांक ३१ मे रोजी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जयंती निमित्त अहिल्यादेवी तरुण मंडळा तर्फे सालाबाद प्रमाणे दरवर्षी किर्तन सोहळा संपन्न होत असतो.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सकाळी ९ वाजता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भव्य फटाक्यांची आतिषबाजी केली जाते.त्यानंतर आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात येते.आणि सर्वांना अल्प उपहार दिला जातो.

याही वर्षी अहिल्यादेवी तरुण मंडळाने दि.३१ रोजी सायंकाळी ९ ते ११ या वेळेत अहिल्यादेवी मंदिर खानवटे येथे सुप्रसिद्ध किर्तनकार झी टी व्ही फेम ह.भ.प.विकास महाराज देवडे यांचे भव्य असे किर्तन आयोजित केले आहे.धांगडधिंगा, डीजे, तमाश, ऑर्केस्ट्रा अशा कार्यक्रमाला फाटा देत कीर्तन सोहळा आयोजित करून एक नविन पायंडा खानवटे गावामध्ये पाडला आहे या सांप्रदायिक कार्यक्रमामुळे राजमाता अहिल्यादेवी होळकर तरुण मंडळाचे सर्वत्र कौतुक होत असून या किर्तन सोहळ्याचा आनंद सर्वांनी घ्यावा असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिमराव पवार यांनी केले आहे.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीला सर्वांनी उपस्थित रहावे


## छावा दल संस्थापक अध्यक्ष विनायकराव भिसे पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण



हिंगोली येथे होत असलेल्या ३१ मे रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त सर्वांनी जयंतीला येऊन जयंतीची स्वभाव वाढवावी यासाठी छावा दलाचे संस्थापक अध्यक्ष विनायकराव भिसे पाटील यांनी गावोगावी जाऊन तरुण मंडळी व नागरिकाना आव्हान केले दरवर्षीप्रमाणे याही वर्षी धर्मवीर छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करायची असून ३१ मे रोजी सर्वांनी हिंगोली येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीला उपस्थित रहावे असे आव्हान केले यावेळी भागवत तिडके, हनुमान गाढवे, अमोल तिडके, अंकुश तिडके, गणेश तिडके, बाळू लांडगे, राजू देशमुख, सुनील उटकर, संदीप कोकाटे, महादेव हरण, गजानन इंगळे, गजानन हरण, श्री,पोले, संतोष हरण, रामजी तिडके, गंगाआप्पा जिरवणकर, अनिल मगर, बालाजी हरण, शुभम तिडके, गजानन पवार, भागवत पवार, गोपाल पवार, कृष्णा पवार, राहुल गाढवे, प्रवीण गवळी, अर्जुन गवळी, गौरव गवळी, आकाश हरण,भागवत हरण, व आदी कार्यकर्ते पदाधिकारी व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते,



# राज्यस्तरीय क्रिकेट पंच परीक्षेमध्ये ओशियन क्रिकेट कॅडमी पाटोदा व जामखेड येथील मुले चमकली


## प्रशिक्षक सुशील तांबे यांच्या विद्यार्थ्यांची कामगिरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी

राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट असोसिएशन तर्फे घेण्यात येणाऱ्या पंच परीक्षेमध्ये पाटोदा व जामखेड येथे सुरू असलेल्या ओशियन क्रिकेट कॅडमी च्या मुलांनी घवघवीत यश संपादन केले.

या पंच परीक्षेसाठी टेनिस क्रिकेट असोसिएशन इंडिया च्या सचिव मीनाक्षी गिरी मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. या परीक्षेसाठी तब्बल नऊ जणांनी ओशियन क्रिकेट कॅडमी मधून भाग घेतला या पैकी दहाची दहा मुले यशस्वी झाली. या मध्ये देवांश बांगर, पृथ्वी भोंडवे, अंश कांकरीया, संकेत बांगर, आदित्य जायभाय, समर्थ देशमुख, विनय घाडगे, साईराज जाधव यांनी यश मिळावले. अकॅडमीचे तांबे सर यांनी विशेष तयारी मुलांकडून करून घेतली. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदन केले जात आहे.



# आता सातबारावर दिसणार आईचे नाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे । प्रतिनिधी

शाळेच्या दाखल्यासह विविध सरकारी कागदपत्रांमध्ये आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय राज्य सरकारने याआधीच घेतला आहे. आता आणखी एका महत्त्वाच्या कागदपत्रांमध्ये आईच्या नावाचा समावेश करण्यात येणार आहे. सातबारा उताऱ्यावर अर्जदाराच्या नावानंतर आता त्याच्या आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाकडून घेण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राज्य सरकारच्या महिला व बालकल्याण विभागाने काही महिन्यांपूर्वी महिलांच्या नावाचा अर्थात आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला होता. त्याच अनुषंगाने १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावे जमीन, सदनिका खरेदी केल्यास त्याच्या नावासह आईच्या नावाचा उल्लेख करण्यात येणार आहे. त्या संदर्भात भूमी अभिलेख विभागामार्फत संगणकप्रणाली राबविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. सहा महिन्यांत होणार अंमलबजावणी दरम्यान, सातबारा उताऱ्यात आईच्या नावासाठी नवा कॉलम तयार केला जात आहे. त्यामुळे पुढील सहा महिन्यांत याची अंमलबजावणी होईल अशी माहिती मिळाली आहे. त्यासोबत आईचे नाव लावण्यासाठी काही कागदपत्रे गरजेची आहेत. आई असल्याचा पुरावा दिल्यानंतरच आईचे नाव लावता येणार आहे. तसेच तलाठी कार्यालयात शहानिशा केल्यानंतर ही नोंदणी होईल असे सांगण्यात आले आहे. विवाह आधीच्या नावानेही होईल नोंदणीसध्या महिलांची नावे लावताना महिलेचे स्वतःचे नाव, पतीचे नाव आणि आडनाव असा क्रम आहे. मात्र सातबारा उताऱ्यावर आईचे नाव लावताना त्यांचे आधीचे म्हणजे लग्नापूर्वीचे नाव देखील लावण्याची मुभा असणार आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904